भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १९६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १८/०३/२०१७

१) मंदीरातुन साहित्याची चोरी . :—

दिनांक १७/०३/२०१७ चे १२.३० वा. दरम्यान यातील आरोपीने साईमंदीर तुळका साईबाबाचे मुर्तीचे मुकुटावरील छत्र व पितळेच्या लहान मोठया समया ४ नग असा एकुण ८,०००/—रु. चा माल खुल्या मंदीरात प्रवेश करुन चोरुन नेतांनी मिळुन आल्याने फिर्यादी शिवशंकर मोतीराम पडोळे वय ५९ वर्ष, रा. बोस नगर तुमसर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुरले पो. स्टे. तुमसर हे करीत आहेत आरोपी अटक आहे.

२) मोटार सायकल चालकाने बसचे मागचे बाजुला धडक मारुन स्वत: गंभिर जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक १७/०३/२०१७ चे १७.३० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने, हयगयीने व निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे पॉलीटेक्नीकल कॉलेज सितासावंगी येथील बस क्र. एमएच ३६/०६६९ ला समोरुन येवुन बसचे मागचे उजवे चाकाला धडक मारुन स्वत: गंभिर जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी विनोद दौलत झंझाळ वय ३६ वर्ष, रा. सितासावंगी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम २७९,३३८ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बावने पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

३) सार्वजनीक ठिकाणी वाहन उभे ठेवुन रहदारीस अळथडा निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक १७/०३/२०१७ चे १२.३० वा. दरम्यान. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील बोलेरो मॅक्स गाडी क्र. एमएच ४०/६१०८ चा चालक याने आपल्या ताब्यातील वाहन राज्य मार्ग क्र. २७१ वर अडयाळ बस स्टॉप समोर धोकादायक रित्या उभी करुन रहदारीस अडथळा निर्माण केल्याने पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २८३ भादवि. मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बोरकर पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

४) अवैध दारु अडयांवर धाडी . :—

दिनांक १७/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. कारधा, सिहोरा व लाखांदुर येथे अवैध दारु अडयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन २० लिटर हातभट्टी दारु किंमती १२५०/—रु. तसेच १ लिटर ३५० मिली लिटर देशी दारु असा एकुण किंमती १६२५/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

५) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक १७/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ७१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०३, तीन सिटर वाहनांवरती ०३ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ६५ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.